# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. १६६ दिनांक २२/०६/२०२१

## हातभट्टीवर दारु तयार करण्याचे ठिकाणावर वालीव पोलीसांची कारवाई, ८१,३००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त

वालीव पोलीस ठाणे हद्दीत मौजे मालजीपाडा गावाचे खाडीकिनारी झाडाझुडुपात एक इसम गावठी हातभट्टीची दारु तयार करत असल्याबाबत मिळालेल्या खात्रीशिर बातमीवरुन वपोनि. विलास चौगुले यांचे मार्गदर्शनाखाली बापाने चौकीतील अधिकारी/अंमलदार अशांनी दि.१९.०६.२०२१ रोजी दुपारी ०२.०० वा.चे सुमारास खाजगी बोटीचे सहाय्याने मालजीपाडा गावचे खाडीलगत दाट झाडीमध्ये जावून खात्री केली असता, इसम नामे संदेश गोपाल नाईक, रा. मालजीपाडा, हा गावठी हातभट्टीची दारु तयार करीत असल्याचे दिसले. सदर ठिकाणी पोलीस आल्याची त्यास चाहुल लागताच संशयीत नामे संदेश गोपाल नाईक हा दलदल आणि झाडाझुडुपाचा फायदा घेवुन तेथून पळुन गेला. सदर कारवाईत पोलीसांनी ६००० लिटर नवसागर मिश्रीत गुळाचा वॉश, २०० लिटर गावठी हातभट्टीची दारु तसेच गावठी दारु बनविण्याकरीता लागणारे साहीत्य असा एकुण ८१,३००/- रु. कि.चा मुद्देमाल पंचासमक्ष जागीच जप्त केला आहे. सदरबाबत वालीव पोलीस ठाणे येथे गुरक्र ५७१/२०२१ मु.प्रो.ॲक्ट कलम ६५ (ई) प्रमाणे दि. १९.०६.२०२१ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदरची छापा कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त- परिमंडळ-२, श्री अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, तुळींज यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वपोनि वालीव पोलीस ठाणे, पोउनि लक्ष्मण बोरा, सफौ/मारुती नांदगावकर, पोना/योगेश घुगे, पोना/महेश बोडके, पोशि/विरकर यांनी केलेली आहे.

-------oooooo--------